।। सा विद्या या विमुक्तये ।।

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED**

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

**EXAMINATION SECTION**

**Phone: (02462) 229294** **website: srtmun.ac.in** **e-mail: directorboee@gmail.com**


संदर्भ : परीक्षा/२०२०-२१/९९० दिनांक : १७/०२/२०२१

## :: परीपत्रक ::

प्रति,
प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ
संचालक, सर्व संकुल, प्रस्तुत विद्यापीठ
संचालक, प्रस्तुत विद्यापीठ उपकेंद्र, लातूर व परभणी
प्राचार्य, न्यु मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली
समन्वयक, कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास संशोधन केंद्र, किनवट

विषय : उन्हाळी-२०२० परीक्षेतील अनुतीर्ण (Fail but promoted to higher class) विद्यार्थ्यांच्या हिवाळी-२०२० परीक्षेसाठी आवेदन पत्र सादर करणे बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयी आपणांस कळविण्यात येते की, दिनांक ११/०२/२०२१ रोजी संपन्न झालेल्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीतील विषय क्रमांक ४/०२-२०२१ नुसार उन्हाळी-२०२० परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना शासन निर्णयाप्रमाणे पुढील वर्गामध्ये (Fail but promoted to higher class) नुसार प्रवेश देण्यात आलेला आहे. अशा विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होवू नये म्हणून हिवाळी-२०२० परीक्षेसाठी उन्हाळी-२०२० परीक्षेतील अनुत्तीर्ण विषयाबरोबर पुढील प्रवेशीत वर्गाच्या सत्राची परीक्षा देण्यास परवानगी देणेबाबत परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आलेली आहे.

सबब, परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या वरील निर्णयाप्रमाणे खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

०१. तीन वर्षीय पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम व द्वितीय वर्षासाठी विद्यार्थ्यांना (Fail but promoted to higher class) नुसार पुढील प्रवेशीत वर्गाचे हिवाळी-२०२० परीक्षेसाठी आवेदनपत्र भरण्यास मान्यता देण्यात येते.

०२. पदवी अभ्यासक्रमाचे प्रथम वर्ष अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना तृतीय वर्षाची परीक्षा देता येणार नाही अशा विद्यार्थ्यांना हिवाळी-२०२० मध्ये प्रथम वर्ष उत्तीर्ण केल्यानंतर तृतीय वर्षाच्या दोन्ही सत्राची परीक्षा एकत्रित उन्हाळी-२०२१ परीक्षेमध्ये देता येईल.

०३. चार वर्षीय पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना वरील प्रमाणे (Fail but promoted to higher class) नुसार पुढील प्रवेशीत वर्गाचे हिवाळी-२०२० परीक्षेसाठी आवेदनपत्र भरण्यास मान्यता देण्यात येते परंतु प्रथम वर्ष उत्तीर्ण केल्याशिवाय तृतीय वर्षाची व द्वितीय वर्ष उत्तीर्ण केल्याशिवाय अंतीम वर्षाची परीक्षा देता येणार नाही. अशा विद्यार्थ्यांना प्रथम वर्ष उत्तीर्ण केल्यानंतर तृतीय वर्षाच्या दोन्ही सत्रांची तसेच द्वितीय वर्ष उत्तीर्ण केल्यानंतर चतुर्थ वर्षाच्या दोन्ही सत्रांची एकत्रित परीक्षा उन्हाळी-२०२१ मध्ये देता येईल.

०४. दोन वर्षीय पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना वरीलप्रमाणे (Fail but promoted to higher class) नुसार द्वितीय वर्षाच्या तृतीय सत्राची हिवाळी-२०२० परीक्षेसाठी आवेदनपत्र भरण्यास मान्यता देण्यात येते.

०५. वरीलप्रमाणे प्रवेश व परीक्षा देण्याची संधी केवळ कोविड-१९ चा प्रादुर्भाव व निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे नियीमत सत्रांची (अंतीम वर्ष वगळून) उन्हाळी-२०२० परीक्षा झालेली नसल्यामुळे देण्यात येत आहे.

०६. वरील विद्यार्थ्यांना हिवाळी-२०२० परीक्षेचे परीक्षा आवेदनपत्र दिनांक २७/०२/२०२१ पर्यंत महाविद्यालयामध्ये स्विकारुन दिनांक ०१/०३/२०२१ रोजी एनईएफटी/डी.डी. द्वारे परीक्षा शुल्काचा भरणा करुन दिनांक ०२/०३/२०२१ रोजी सर्व आवेदनपत्र खास दुतामार्फत परीक्षा विभागामध्ये सादर करावेत.

सबब, वरील प्रमाणे नोंद घेऊन सर्व संबंधीताना आपल्या स्तरावरुन कळवावे.

आपला,

प्र.संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहितीस्तव:**

मा.कुलगुरू महोदय, प्रस्तुत विद्यापीठ

मा. प्र-कुलगुरू,महोदय, प्रस्तुत विद्यापीठ

**प्रत कार्यवाहीस्तव**

उपकुलसचिव, सहा.कुलसचिव, अधिक्षक, सहा.अधिक्षक, परीक्षा विभाग